
# आलुबुखारमुळे हाडांची मजबुती




**वॉशिंग्टन :** लालसर निळ्या रंगाचे आलुबुखार म्हणजेच प्लम हे फळ भरपूर पोषक तत्त्व आणि जीवनसत्त्वयुक्त आहे. या फळात कॅल्शियम, मॅग्नेशियम, आयर्न, पोटॅशियम आणि फायबर असते. मधुमेह आणि वजन कमी करण्यासाठी हे फळ लाभदायी आहे. सुकवलेले आलुबुखार हाडांच्या मजबुतीसाठी उपयुक्त असून ऑस्टियोपोरोसिस या अस्थिविकाराच्या रुग्णांसाठी ते फायदेशीर असल्याचे संशोधन नुकतेच अमेरिकी संशोधकांनी केले आहे.

पेन्सिल्वेनिया विद्यापीठाच्या संशोधकांनी केलेले हे संशोधन 'द अॅडवॉन्स इन न्यूट्रिशन' या नियतकालिकेत प्रसिद्ध झाले आहे. सुके आलुबुखार आरोग्यासाठी खूपच फायदेशीर असतात. शरीराला फायबर न मिळाल्याने आरोग्याच्या अनेक समस्या उद्भवतात. फायबरचे कमी सेवन झाल्याने आतड्यांच्या हालचाली मंदावतात. मात्र नियमित सुके आलुबुखार खाल्ल्याने आतड्यांच्या हालचालींची




वारंवारत सुधारते आणि त्याचबरोबर वजन घटण्यासही मदत होते, असे या संशोधकांच्या वतीने सांगण्यात आले.

ऑस्टियोपोरोसिस हा एक हाडांचा आजार असून या आजारात हाडे ठिसूळ बनतात. त्यामुळे छोट्याशा अपघातानंतरही फ्रॅक्चर होण्याची शक्यता वाढते. याचे मुख्य कारण म्हणजे शरीरातील कॅल्शियम व प्रोटीन यांची म्हणजेच 'बोन मिनरल डेन्सिटीची' झालेली कमतरता होय. वाढत्या वयाबरोबर हाडांमध्ये कॅल्शियम आणि 'जीवनसत्त्व ड'ची कमतरता होऊन ऑस्टियोपोरोसिसची सुरुवात होते. ऑस्टियोपोरोसिसचा सर्वात जास्त परिणाम पाठीचा कणा, खुबा व मनगटाची हाडे यांवर होतो. मात्र सुक्या आलुबुखाराचे नियमित सेवन केल्यास हाडे ठिसूळ होण्यास प्रतिबंध निर्माण होतो आणि ऑस्टियोपोरोसिस हा विकार होण्यापासून कमी धोका निर्माण होते, असे या संशोधकांनी सांगितले.




# शिवाजी मंदिर नाट्यगृहाचा नवा 'खेळ'

## ५८ व्या वर्धापनदिनी रंगमंच पुन्हा रसिकांसाठी सज्ज

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**



**मुंबई :** करोनाचा प्रादुर्भाव सुरू झाला आणि मार्च २०२० मध्ये सार्वजनिक ठिकाणे बंद करण्यात आली. यात मुंबईकरांचे मनोरंजन करणाऱ्या नाट्यगृहांचाही समावेश होता. तब्बल दोन वर्ष दोन महिने करोना काळाचा अंधार सोसल्यानंतर दादरचे प्रसिध्द श्री शिवाजी नाट्यमंदिर पुन्हा एकदा प्रेक्षकांचे स्वागत करण्यासाठी सज्ज झाले आहे.

नूतनीकरण झालेल्या या नाट्यगृहाचा शुभारंभ सोहळा ३ मे रोजी आयोजित करण्यात आला आहे. नवे रंग-रुप घेऊन प्रेक्षकांच्या मनोरंजनासाठी तयार असलेले शिवाजी मंदिर नाट्यगृह सुरू झाल्याने गेले दोन वर्ष दादर आणि परिसरातील नाट्यप्रेमींची उपासमार संपली असून निर्मात्यांमध्येही उत्साह संचारला आहे.

दादर परिसरात शिवाजी मंदिर नाट्यगृह आणि यशवंतराव चव्हाण नाट्यसंकुल या दोन नाट्यगृहांमध्ये नाटकांचे प्रयोग लावले जातात. मात्र गेली दोन वर्ष ही दोन्ही नाट्यगृहे बंद आहेत. करोनाकाळातील बंदी आणि निर्बंध शिथिल झाल्यानंतर नाटक व्यवसायाची सुरूवात झाली, मात्र ही दोन्ही नाट्यगृहे बंदच होती. त्यामुळे दादर आणि परिसरातील हक्काच्या प्रेक्षकांवर निर्मात्यांना पाणी सोडावे लागले होते. 'करोना काळात दोन वर्ष नाट्यगृह बंद होते. त्यामुळे त्याची दुरुस्ती - डागडुजी करणे गरजेचे झाले होते. दुरूस्ती करून नाट्यगृह सुरू करण्यापेक्षा संपूर्ण नूतनीकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला. नूतनीकरणाचे काम पूर्ण झाले असून आता नाट्यगृह सज्ज आहे', अशी माहिती शिवाजी मंदिरचे चिटणीस बजरंग चव्हाण यांनी दिली. नाट्यगृहाची आतील सजावट नव्याने करण्यात आली आहे. रंगमंचाचे नूतनीकरण करण्यात आले असून ध्वनी यंत्रणा पूर्णपणे बदलण्यात आली आहे. डिजिटल ध्वनीयंत्रणा शिवाजी मंदिर नाट्यगृहात बसवण्यात आली असल्याचेही चव्हाण यांनी सांगितले.

### निर्मात्यांच्या आग्रहाखातर...


सुट्टीचा हंगाम असल्याने सध्या शनिवार - रविवार नाटकाचे प्रयोग असतात. त्यामुळे नाट्यनिर्मात्यांच्या आग्रहाखातर ३० एप्रिल आणि १ मे या दोन्ही दिवशी शिवाजी मंदिरमध्ये 'अलबत्या गलबत्या', 'हीच तर फॅमिलीची गंमत आहे', 'दादा गुड न्यूज आहे', 'आमने सामने' अशा नाटकांचे प्रयोग होणार असले तरी अधिकृतरित्या सुरूवात ३ मे लाच होणार असल्याचे चव्हाण यांनी स्पष्ट केले.

**अक्षय्य तृतियेचा मुहूर्त**

अक्षय्य तृतियेच्या मुहूर्तावर नाट्यगृहाचा अधिकृत शुभारंभ सोहळा आयोजित करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. नाट्यगृहाचा ५८ वा वर्धापनदिनही असल्याने हा दुग्धशर्करा योग जुळून आला आहे. प्रसिध्द नाट्यदिग्दर्शक चंद्रकांत कुलकर्णी यांच्या 'संज्या छाया' या नाटकाचा पहिला प्रयोग त्यादिवशी रंगणार आहे.

# ज्येष्ठ अभिनेते सलीम घौस यांचे निधन


**मुंबई:** ऐंशीच्या दशकात गाजलेल्या 'भारत एक खोज', 'वागले की दुनिया' या दूरचित्रवाणीवरील हिंदी मालिकांतून तसेच चित्रपटांतून घराघरांत पोहोचलेले ज्येष्ठ अभिनेते



सलीम घौस यांचे गुरुवारी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. ते ७० वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी आणि अन्य परिवार आहे.

सलीम घौस यांच्या निधनावर हिंदी चित्रपटसृष्टी आणि मालिकाविश्वातून शोक व्यक्त केला गेला आहे. बुधवारीच त्यांची प्रकृती खालावल्याने त्यांना मुंबई येथील कोकिलाबेन रुग्णालयात भरती करण्यात आले होते; परंतु गुरुवारी सकाळीच त्यांची प्राणज्योत मावळली.

अभिनेते सलीम घौस हे त्यांच्या अभिनयासह, आवाज आणि संवादशैली आणि देहबोलीसाठी ओळखले जायचे. त्यांनी हिंदीसह तमिळ, तेलुगु, मल्ल्याळम, इंग्रजी अशा भाषांतील चित्रपटांतून अभिनय केला आहे. १९७८ साली आलेल्या 'स्वर्ग नरक' या हिंदी चित्रपटांतून त्यांनी चित्रपटसृष्टीत पदार्पण केले. त्यानंतर 'चरका' (१९८१), 'मोहन जोशी हाजिर हो' (१९८४), 'सारांश' (१९८४), 'त्रिकाल' (१९८५) असे त्यांचे गाजलेले चित्रपट आहेत.





# तीन दिवसांपासून मुंबईत विजेचा खेळखंडोबा

## मुंबादेवी परिसरात पावणेतीन तास वीजपुरवठा खंडित

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई:** विजेच्या वाढत्या मागणीमुळे बेस्टकडून केल्या जाणाऱ्या विद्युत पुरवठ्यात सातत्याने तांत्रिक बिघाड होत असून गुरुवारीही मुंबादेवी परिसरात सायंकाळी ६ वाजल्यापासून पावणेतीन तास वीजपुरवठा खंडित होता. त्यामुळे या परिसरातील नागरिकांना ऐन उकाड्यात चांगलाच घाम फुटला. २६ एप्रिलपासून सातत्याने मुंबई व परिसरात होणाऱ्या



विजेच्या खेळखंडोबामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत.

मुंबईसहित उपनगरांमध्ये वीजपुरवठा करणाऱ्या कळवा पडघा येथील वीजपुरवठा केंद्रामध्ये २६ एप्रिलला बिघाड झाला होता. त्यामुळे सकाळी साडेदहाच्या सुमारास मुंबईतील दादर, माहीम, वांद्रे, सांताक्रुझ आणि इतर भागांमध्ये तसेच ठाणे डोंबिवलीमध्ये अनेक ठिकाणी वीजपुरवठा खंडित झाला. त्यानंतर २७ एप्रिलला बेस्टकडून केल्या जाणाऱ्या ११ किलोवॉल्टच्या विद्युत पुरवठ्यात सकाळी सातच्या सुमारास तांत्रिक बिघाड झाल्याने मुंबादेवीसह अन्य परिसरातील, वीज गायब झाली. वीजपुरवठा सुरळीत होण्यासाठी अर्धा तास लागल्यानंतर सायंकाळी सहाच्या सुमारास प्रभादेवीतील महत्त्वाच्या ११ किलोवॉल्टच्या फिडरमध्येही तांत्रिक बिघाड झाला आणि एक तासाने वीजपुरवठा पूर्ववत झाला. भायखळातही काही वेळ वीज नसल्याने नागरिकांना मनस्ताप झाला.

त्यानंतर गुरुवारी पुन्हा मुंबादेवी परिसरात विद्युत पुरवठा होणाऱ्या भूमिगत केबलमध्ये तांत्रिक समस्या उद्भवली. परिणामी सायंकाळी सहा वाजल्यापासून या परिसरातील वीज गायब झाली. दोन तासांपेक्षा अधिक वेळ होऊनही वीज सेवा पूर्ववत न झाल्याने या भागातील नागरिकांची गैरसोय झाली. वाढलेल्या उकाडामुळे आधीच त्रस्त झालेल्या नागरिकांच्या घामाच्या धारा निघाल्या. बराच वेळ वीज नसल्याने मोबाइल, लॅपटॉपही चार्ज होऊ शकले नाहीत. बेस्टच्या विद्युत कर्मचाऱ्यांकडून पुरवठा पूर्ववत करण्याचे प्रयत्न सुरू होते. साधारण रात्री आठच्या सुमारास २५ टक्के विद्युत पुरवठा पूर्ववत केला. मात्र अन्य भागांतील पुरवठा पूर्ववत होण्यासाठी काही वेळ लागला. त्यानंतर रात्री ८ वाजून ५० मिनिटांनी मुंबादेवीच्या उर्वरित परिसरातील वीज सेवा सुरळीत करण्यात विद्युत पुरवठा विभागाच्या कर्मचाऱ्यांना यश आले.

# गणेश नाईक यांच्या अटकपूर्व जामीन अर्जावर उद्या निर्णय

**ठाणे :** भाजपचे आमदार गणेश नाईक यांनी ठाणे न्यायालयात दाखल केलेल्या अटकपूर्व जामीन अर्जावरील निकाल आता आज, शनिवारी घेण्यात येणार आहे. गणेश नाईक यांच्याविरोधात एका महिलेने धमकी आणि लैंगिक अत्याचाराची तक्रार पोलीस ठाण्यात दिली होती.

भाजपचे आमदार गणेश नाईक यांच्याविरोधात एका महिलेने धमकी आणि लैंगिक अत्याचार प्रकरणी तक्रार दाखल केली आहे. या तक्रारीनुसार त्यांच्याविरोधात नवी मुंबई येथील सीबीडी आणि नेरूळ पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्यामुळे गणेश नाईक यांनी वकिलांमार्फत अटकपूर्व जामीनासाठी ठाणे न्यायालयात धाव घेतली होती. त्यावरील सुनावणी बुधवारी पूर्ण झाली. गुरुवारी त्यांच्या अटकपूर्व जामीन अर्जावर निकाल लागणार होता. परंतु आता हा निकाल शनिवारी लागणार असल्याची माहिती महिलेच्या वकिलांनी दिली.

# कांजूर येथील सहा हजार एकरवर खासगी कंपनीचा दावा

## हुकुमनामा रद्द करण्याची जिल्हाधिकारी कार्यालयाची मागणी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** कंजूरमार्ग येथील जागेवरून केंद्र आणि राज्य सरकारमध्ये वाद सुरू असताना एका खासगी कंपनीने वादग्रस्त जागेसह परिसरातील ६,३७५ एकर जागेची मालकी मिळाल्याचा दावा केला आहे. त्यात कंजूरमार्ग मेट्रो कारशेडच्या १०२ एकर जागेचाही समावेश आहे. न्यायालयाची दिशाभूल करून जमिनीची मालकी मिळवली आहे, असा आरोप जिल्हाधिकारी कार्यालयाने केला असून या खासगी कंपनीला जागेचा व्यवहार करण्यासाठी दिलेली मान्यता रद्द करावी किंवा त्यातून शासनाच्या जमिनी वगळाव्यात अशी मागणी उच्च न्यायालयात केली आहे.

कांजूर गावातील बहुतांश जागा पूर्वापार प्रमाणे खोत सरकारी आणि काही खासगी व्यक्तींच्या ताब्यात होती. जमिनीसंदर्भात १९५१ मध्ये आलेल्या कायद्यानुसार न कसलेल्या, वहिवाट नसलेल्या जमिनी सरकारने काढून घेतल्या. त्याविरोधात खोतांनी न्यायालयात धाव घेतली. त्यानुसार १९६३ मध्ये संमती हुकूमनाम्याच्या माध्यमातून काही जागा खोताला आणि काही जागा सरकारला देण्यात आल्या. आजही कांजूरमधील बरीच सरकारकडे असून ती वन विभागाला, रेल्वेला देण्यात आली आहे. त्याशिवाय संरक्षण मंत्रालय, मीठ आयुक्त, पालिका यांच्या मालकीच्याही काही जागा आहेत.

**शासनही अनभिज्ञ** कांजूर गावातील ८७ एकर जमीन सरकारकडून भाडेतत्त्वावर घेतलेल्या एका व्यक्तीने संमती हुकुनाम्याला २०२० मध्ये न्यायालयात आव्हान दिले. त्यात सरकारला पक्षकार केल्यानंतर हा सर्व प्रकार उघड झाला तोपर्यंत सरकारलाही याबाबत कोणताही सुगावा नव्हता. त्यानंतर जिल्हाधिकारी यांनी याची चौकशी केली असता २०२० मध्ये समंती हुकुमनामा तयार करण्यात आल्याचे लक्षात आले. त्यानंतर जिल्हाधिकारी यांनी अंतरिम अर्ज दाखल करून संमती हुकुमनामा रद्द करावा व कंपनीविरोधात कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी केली आहे. आता न्यायालयाच्या आदेशानुसार पुढील कार्यवाही केली जाईल अशी माहिती उपजिल्हाधिकारी पद्माकर रोकडे यांनी लोकसत्ता ला दिली.

कांजूर येथील प्रस्तावित मेट्रो कारशेडच्या जागेवरून केंद्र आणि राज्य सरकारमध्ये सध्या वाद सुरू आहे. असे असताना आता एका खासगी कंपनीने ६३७५ एकर जागेवर मालकी मिळाल्याचा दावा केला आहे. त्यावर उच्च न्यायालयाची दिशाभूल करून मालकी मिळवल्याचे जिल्हाधिकारी कार्यालयाने म्हटले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून मिळालेल्या माहितीनुसार खोताचे वारस आणि संबंधित खासगी कंपनीमध्ये वाद सुरू होता.

# उद्घाटनापूर्वीच समृद्धीवर दुर्घटनांचे सत्र

## सिंदखेडराजाजवळ पुलाचा भाग कोसळला

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**अकोला :** राज्यातील महत्त्वाकांक्षी प्रकल्प असलेल्या नागपूर-मुंबई समृद्धी महामार्गाच्या उद्घाटनापूर्वीच तेथे दुर्घटनांचे सत्र सुरू आहे. उन्नत वन्यजीव मार्गाच्या कमानीचा भाग कोसळण्याची घटना ताजी असतानाच बुलढाणा जिल्ह्याच्या सिंदखेडराजाजवळील समृद्धी महामार्गावरील निर्माणाधीन पुलाचा भाग (गर्डर) कोसळला. महामार्गाच्या पॅकेज ७ मध्ये पिंपळखुटा गावाजवळ दोन डोंगराळ प्रदेशाला जोडणाऱ्या उड्डाणपुलावर ही दुर्घटना बुधवारी रात्री घडली. या अपघातात पुलाखालील उभ्या ट्रेलरचे मोठे नुकसान झाले. अपघातात जीवितहानी टळली.



### काम आणखी लांबणीवर?

दुर्घटना घडली, त्यावेळी कामगार भोजनासाठी गेल्याने ते बचावले. या अपघातामुळे समृद्धी महामार्गाचे काम आणखी लांबणीवर पडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गातील नागपूर ते वाशीम जिल्ह्यातील शेलू बाजार अशा २१० किमी लांबीच्या मार्गाचे उद्घाटन २ मे रोजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते होणार होते. मात्र, नागपूरजवळ पहिल्या टप्प्यात वन्यजीवांसाठी बांधण्यात येत असलेल्या एका उन्नत मार्गाचा भाग कोसळला. त्यामुळे उद्घाटन लांबणीवर पडले.

आता सिंदखेडराजा तालुक्यातील पिंपळखुटा गावाजवळ दोन डोंगराळ भागाला जोडणाऱ्या उड्डाणपुलाचा जवळपास २०० टन वजनाचा गर्डर ८० फुटावरून खाली पडला. हा पूल ५०० मीटर लांबीचा असून ८० फूट उंच आहे.

# बांधकाम व्यवसायिक संजय छाब्रिया यांना सीबीआयकडून अटक

**मुंबई:** येस बँक गैरव्यवहाराची चौकशी करणाऱ्या केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) गुरुवारी बांधकाम व्यवसायिक संजय छाब्रिया यांना अटक केली, अशी माहिती सूत्रांनी दिली. ते रेडियस ग्रुपशी संबंधित आहेत. रेडियस ग्रुपने डीएचएफएलकडून कर्ज घेतले होते. त्यांचे तीन हजार कोटी रुपयांचे कर्ज थकीत आहे. सीबीआयच्या म्हणण्यानुसार, येस बँकेचे सहसंस्थापक राणा कपूर आणि त्यांच्या कुटुंबीयांना गृहनिर्माण वित्त कंपनी डीएचएफएल च्या डिबेंचरमध्ये बँकेने केलेल्या ३ हजार ७०० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसाठी सुमारे ६०० कोटी रुपये मिळाल्याचा आरोप आहे.

SBI Life
Apne liye. Apno ke liye.

SBI Life Insurance Company Limited
CIN : L99999MH2000PLC129113
Registered and Corporate Office: Natraj, M. V. Road & Western Express Highway Junction, Andheri (East), Mumbai - 400 069
(IRDAI Regd. No.: 111 dated 29th March, 2001)
Tel.: +91 22 6191 0000, Fax: +91 22 6191 0338, E-mail- investorrelations@sbilife.co.in, Website- www.sbilife.co.in

**FINANCIAL RESULTS**

(₹ in Lakhs)

| Sl. No. | Particulars | Three months ended/ As at | | Year ended/ As at | |
|---|---|---|---|---|---|
| | | March 31, 2022 (Audited) | March 31, 2021 (Audited) | March 31, 2022 (Audited) | March 31, 2021 (Audited) |
| 1 | Premium Income (Gross)[1] | 17,50,850 | 15,64,672 | 58,75,964 | 50,25,416 |
| 2 | Net Profit /(Loss) for the period (before Tax, Exceptional and/or Extraordinary items) | 69,406 | 62,213 | 1,56,075 | 1,54,246 |
| 3 | Net Profit /(Loss) for the period before tax (after Exceptional and /or Extraordinary items) | 69,406 | 62,213 | 1,56,075 | 1,54,246 |
| 4 | Net Profit /(Loss) for the period after tax (after Exceptional and /or Extraordinary items) | 67,215 | 53,238 | 1,50,599 | 1,45,585 |
| 5 | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit /(Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)][2] | NA | NA | NA | NA |
| 6 | Equity Share Capital (Paid up) | 1,00,037 | 1,00,007 | 1,00,037 | 1,00,007 |
| 7 | Reserves (excluding Revaluation Reserve and fair value change account.) | 10,41,807 | 9,09,264 | 10,41,807 | 9,09,264 |
| 8 | Earnings Per Share (face value of ₹10/- each) | | | | |
| | 1. Basic (not annualised for three months) (in ₹) | 6.72 | 5.32 | 15.06 | 14.56 |
| | 2. Diluted (not annualised for three months) (in ₹) | 6.71 | 5.32 | 15.04 | 14.55 |

**Note:**
1) Premium income is gross of reinsurance and net of Goods and Service Tax (GST).
2) The Indian Accounting Standards (Ind AS) are currently not applicable to Insurance companies in India.
3) The above is an extract of the detailed format of quarterly financial results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing and Other Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the quarterly financial results are available on the website of the Stock Exchanges (www.nseindia.com and www.bseindia.com) and the Company (www.sbilife.co.in).

For and on behalf of Board of Directors

Place: Mumbai
Date: April 28, 2022

Mahesh Kumar Sharma
Managing Director & CEO
(DIN: 08740737)

NW/AFRS/ver1/04/22/ADVT/ENG